# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ०९ फेब्रुवारी २०१६

## मुंबई विद्यापीठात आता विमानउड्डाणाचे धडे

## गरवारे संस्थेमध्ये तीन वर्षीय बीएस्सी इन एव्हीएशन आणि कमर्शियल पायलट ट्रेनिंग कोर्स होणार सुरु

मुंबई – पारंपारिक शिक्षणाबरोबर व्यवसायाभिमूख शिक्षणाची कास धरणा-या मुंबई विद्यापीठांने व्यवसायाभिमूख अभ्यासक्रम,आणि नाविण्यपूर्ण शिक्षणक्रमाच्या जोडीला एक पाऊल पुढे टाकत विद्यापीठाच्या गरवारे इन्स्टीट्यूट ऑफ करीअर एज्युकेशन येथे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून बीएस्सी एव्हीएशन आणि कमर्शियल पायलट कोर्स सुरु करण्यात येणार आहे. मुंबई विद्यापीठाची सलग्नित संस्था बॉम्बे फ्लाईंग क्लबच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी येथील गरवारे इन्स्टीट्यूट ऑफ करीअर एज्युकेशन येथे सुरु करण्यात येणार आहे.यासाठी प्रशिक्षणाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना कृतीशील प्रशिक्षण मिळण्याच्या उद्देश्याने एअरक्राफ्ट विकत घेतला जाणार आहे.आज पार पडलेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २००९ मध्ये बॉम्बे फ्लाईंग क्लबच्या सहकार्याने मुंबई विद्यापीठाच्या रत्नागिरी उपकेंद्रामध्ये हा अभ्यासक्रम सुरु करण्यात यावा असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता,मात्र काही अपरिहार्य कारणामुळे त्या उपकेंद्रामध्ये हा अभ्यासक्रम सुरु करता येऊ शकलेला नसल्याने त्याची अमलबजावणी आता या शैक्षणिक वर्षापासून मुंबई विद्यापीठाच्या गरवारे शैक्षणिक संस्थेत होणार आहे.

भारत सरकारच्या स्कील इंडिया मिशनच्या पार्श्वभूमीवर नविन रोजगाराभिमुख आणि कौशल्याधारित अभ्यासक्रम राबविणारे आणि स्कील इंडिया मिशनला अलाईन होणारे मुंबई विद्यापीठ भारतातले पहिले विद्यापीठ असून या पार्श्वभूमीवर गेल्या ३४ वर्षापासून कौशल्यआधारित अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देणारी मुंबई विद्यापीठाची गरवारे करीअर एज्युकेशन संस्थेने कात टाकत हा महत्वाकांक्षी निर्णय घेऊन मुंबई विद्यापीठामार्फत हा अभ्यासक्रम राबविला जाणार आहे.

मुंबई विद्यापीठांने समाजाचे बौध्दिक आणि नैतिक शक्तीस्थान म्हणून गेल्या १५८ वर्षांत भरीव कामगिरी केली आहे.सामाजिक मुल्य आणि संधींची सतत वाढणारी जबाबदारी उत्साहाने वागवत देशाला विशेषतः महाराष्ट्र आणि मुंबई शहराला उत्तम गुणवत्ता दिली आहे. याच जोडीला मुंबई विद्यापीठाने हे एक महत्वाकांक्षी पाऊल टाकत हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)